ANNEXURE NO. 2 Ex. 6

A-ce

शिवमस्तु सर्व जगतः

होमिओपॅथिक शिक्षण प्रसारक मंडळ, अकोला म.प्र.

भारत सेवक समाज विदर्भ पुरस्कृत.

क्रमांक 197/19 कलम 23

दाराचे नाव डॉ जयप्रकाश [illegible]

आल्याचा दिनांक 06/11/19

नकल तयार दिनांक 01/01/2020

नकल दिल्याची दिनांक 01/01/2020

अधिक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग, अकोला

## घटना व नियम

1 नांव :- या मंडळाचे नांव होमिओपॅथिक शिक्षण प्रसारक मंडळ अकोला हे राहील. या मंडळाचे कार्यालय अकोला येथे राहील.

2 उद्देश :- या मंडळाचे उद्देश खालील प्रमाणे राहतील.

1. अकोला येथे व शक्य असल्यास इतर ठिकाणी होमिओपॅथिक व बायोकेमिक शिक्षणाचा प्रचार करणे.
2. होमिओपॅथिक व बायोकेमिक महाविद्यालय चालविणे.
3. दवाखाने व रुग्णालये चालविणे.
4. अकोला जिल्हा तथा महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षणापासून तो महाविद्यालयीन शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे.
5. अकोला जिल्हा तथा महाराष्ट्रात अभियांत्रिकी, बी. फार्म व तंत्रनिकेतन आदि शैक्षणिक महाविद्यालये काढणे, प्रचार व प्रसार करणे.

3 सभासद :- होमिओपॅथिक शिक्षण मंडळाचे सभासद खालील प्रमाणे राहतील.

1. संस्थापक मंडळाचे सभासद.
2. भारत सेवक समाजाच्या विदर्भ शाखेचा होमिओपॅथिक शाखेचा अभिमान असणारे एक.
3. महाविद्यालयाचा अध्यापक वर्ग.
4. रुग्णालये व दवाखाने यांचे प्रमुख व संस्थापक
5. हित चिंतक रुपये 101 किंवा अधिक रक्कम देणगी देणारे.

4 अधिकार मंडळे :- होमिओपॅथिक शिक्षण प्रसारक मंडळाची अधिकारी मंडळे खालीलप्रमाणे राहतील.

Deputy Charity Commissioner, Akola Region, Akola — धर्मादाय उपआयुक्त, अकोला विभाग, अकोला — सत्यमेव जयते

Secretary, Homoeopathic Education Society, AKOLA (Vidarbha) B.S.

१. संस्थापक मंडळ.
२. कार्यकारी मंडळ.
३. सर्वसाधारण मंडळ.

५ संस्थापक मंडळ :- हे मंडळ खालील ७ सभासदांचे राहील.

१. श्री डी. आर. कुळकर्णी रामदास पेठ आकोला.
२. डॉ. रामदास श्रॉफ रामदास पेठ आकोला.
३ डॉ. डि. एस. नानोटी, स्टेशन रोड आकोला.
४. डॉ. के. डी. पाठक, रामदासपेठ आकोला.
५. वैद्य डी. एस. घोडसे आयुर्वेद तीर्थ रामदासपेठ आकोला.
६. डॉ. एन. वाय. तेलंग रामदासपेठ आकोला
७. डॉ. पी. वाय. तारकस ताजनापेठ आकोला

६ संस्थापक मंडळाचे पदाधिकारी :- या मंडळाचे खालील प्रमाणे पदाधिकारी राहतील.

१. अध्यक्ष.
२ कोषाध्यक्ष.
३ कार्यवाह.

या अधिकाऱ्यांची निवड संस्थापक मंडळ बहुमताने करील.

२ या अधिकाऱ्यांची मुदत पांच वर्षांची राहील.

७ संस्थापक मंडळाचे अधिकार व कार्य- १. वरील उद्देश पूर्ण करण्याची जबाबदारी या मंडळावर राहील.

२. होमिओपॅथिक शिक्षण मंडळाच्या कक्षेत येणाऱ्या सर्व संस्थेच्या स्थावर जंगम मालमत्तेवर या मंडळाचा मालकी हक्क राहील.

३. होमिओपॅथिक शिक्षण प्रसारक मंडळाने चालविलेल्या सर्व संस्थांच्या कार्यावरील नियंत्रण ठेवणे.

४. महाविद्यालये प्राचार्य व उपप्राचार्य तसेच दवाखाने व रुग्णालये यांचे प्रमुख या सर्वांच्या नेमणुका करणे व वेतन ठरविणे. मात्र याप्रमाणे नेमणुका करित असतांना जर हे लोक संस्थापक मंडळाचे सभासद असतील तर यांना खेरीज करून संस्थापक मंडळाचे इतर सभासद हे कार्य करतील.

Secretary, Homoeopathic Education Society, AKOLA. (Vidarbha) B. S.

५. होमिओपॅथिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या कामकाजाचे पोट नियम करणे.

६. या मंडळाच्या सभासदांपैकी कोणी राजीनामा दिल्यास दुर्दैवाने कोणी दिवंगत झाल्यास किंवा अन्य कारणामुळे जागा रिकामी झाल्यास ती जागा संस्थापक मंडळ भरून काढील.

७ हिशोब तपासणीसाची नियुक्ती करणे.

८. कार्यकारी मंडळ :- हे मंडळ खालील सभासदांचे राहील.

१ संस्थापक मंडळाचे पदाधिकारी.

२ भारत सेवक समाजाचा विदर्भ शाखेच्या होमिओपॅथिक शास्त्राचा अभिमान असणारा एक.

३ महाविद्यालयाच्या प्राचार्यातून एक.

४ दवाखाने व रुग्णालये यांच्या प्रमुखातून एक.

५ महाविद्यालयाच्या अध्यापक वर्गातून एक.

६ सर्वसाधारण मंडळाने हितचिंतकामधून निवडून दिलेले दोन.

९. कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी :- संस्थापक मंडळाचे पदाधिकारी हेच या मंडळाचे पदाधिकारी राहतील. या मंडळाची नेमणूक संस्थापक मंडळ करील.
या मंडळाची मुदत पाच वर्षांची राहील.

१०. कार्यकारी मंडळाचे अधिकार व कार्य :- हे मंडळ संस्थापक मंडळाला जबाबदार राहील.

२ महाविद्यालयाचे प्राचार्य व उपप्राचार्य तसेच दवाखाने व रुग्णालये यांचे प्रमुख या खेरीज इतर सर्व नेमणूका करणे व त्यांचे वेतन ठरविणे. मात्र त्याप्रमाणे नेमणूका करित असतांना जर हे लोक कार्यकारी मंडळाचे सभासद असतील तर त्यांना खेरीज करून कार्यकारी मंडळाचे इतर सभासद हे कार्य करतील.

३ संस्थेच्या सर्व शाळा, महाविद्यालये, अभियांत्रिकी, बी फार्म व तंत्रनिकेतने तसेच महाविद्यालये, दवाखाने व

Secretary ~~Treasurer~~,
Homoeopathic Education Society,
AKOLA. (Vidarbha) B. S.

एकमताने घेतलेल्या कामकाजाचे धोरणाशी विसंगत असणारे असे पोटनियम करणे.

४. वार्षिक व पुरवणी अंदाजपत्रक तयार करून संस्थापक मंडळाकडून मंजूर करून घेणे. तसेच कार्यकारी मंडळाच्या कक्षेतील सर्व संस्थांचा अहवाल तयार करून सर्व साधारण मंडळासमोर ठेवणे.

५ सर्व साधारण मंडळाची सभा बोलविणे.

६ सर्व साधारण मंडळाने केलेल्या शिफारशींचा योग्य विचार करणे.

७ संस्थापक मंडळाचे सभासद सोडून या मंडळाच्या सभासदांपैकी कोणी राजीनामा दिल्यास दुर्दैवाने कोणी दिवंगत झाल्यास किंवा अन्य कारणामुळे जागा रिकामी झाल्यास ती जागा हे मंडळ भरून काढील

११ सर्व साधारण मंडळ :- या मंडळाचे सभासद नियम ३ मधील सर्व सभासदांचे राहतील.

१२. सर्व साधारण मंडळाचे पदाधिकारी :- संस्थापक मंडळाचे पदाधिकारी हेच या मंडळाचे पदाधिकारी राहतील.

१३. सर्व साधारण मंडळाचे अधिकार व कार्य :-

1 कार्यकारी मंडळाने केलेल्या सर्व कार्याचा विचार करणे.

2 होमिओपॅथिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या उद्देशानुसार योग्य शिफारस कार्यकारी मंडळाकडे करणे.

३ हितचिंतकामधून कार्यकारी मंडळावर दोन सभासदांची निवड करणे होते.

१४. पदाधिकाऱ्यांचे अधिकार व कार्य :-

अध्यक्ष :- या घटनेप्रमाणे कार्य करून घेण्याचे सर्व कामकाजाचे अधिकार राहील.

2 कोषाध्यक्ष - होमिओपॅथिक शिक्षण प्रसारक मंडळाची एकूण जमा खर्च करणे ठेवणे व हिशोब ठेवणे तसेच वार्षिक अंदाजपत्रक तयार करून ते कार्यकारी मंडळाला सादर करणे.

Secretary / ~~Treasurer~~
Homoeopathic Education Society,
AKOLA. (Vidarbha) B. S.

३ कार्यवाह :- या घटनेनुसार सभा बोलावणे सभेच्या कामकाजाची नोंद ठेवणे हिशोब तपासनीकाकडून हिशोब तपासून घेणे तसेच घटनेनुसार सर्व कार्य करणे. कार्यवाह हा अध्यक्षांना जबाबदार राहील.

१५. सभा :-

१ संस्थापक मंडळाच्या वर्षातून कमीत कमी दोन सभा तीन दिवसांच्या पूर्व सूचनेवरुन बोलविण्यात येतील या सभेसाठी कमीत कमी ५ सभासदांची उपस्थिती कायदेशीर समजली जाईल.

2 कार्यकारी मंडळाच्या वर्षातून कमीत कमी चार सभा तीन दिवसाच्या पूर्व सूचनेवरुन बोलविण्यात येतील. या सभेसाठी कमीत कमी पाच सभासदांची उपस्थिती कायदेशीर समजली जाईल.

३. सर्वसाधारण मंडळाची वर्षातून एक सभा सात दिवसाच्या पूर्व सूचनेवरुन बोलविण्यात येईल. या सभेसाठी सभासदांच्या संख्येच्या एक त्रितीयांश सभासदांची उपस्थिती कायदेशीर समजली जाईल.

४. खास कारणास्तव अध्यक्षांना तातडीची सभा घेण्याची आवश्यकता वाटल्यास चोवीस तासांची पूर्व सूचना देऊन तशी सभा बोलविता येईल. संस्थापक मंडळाच्या किंवा कार्यकारी मंडळाच्या या सभेसाठी कमीत कमी चार सभासदांची उपस्थिती कायदेशीर समजली जाईल.

५. योग्य उपस्थितीच्या अभावी बरखास्त झालेली सभा पुन्हा बोलाविली जाईल. या सभेला उपस्थिती संख्येचा नियम लागू होणार नाही. मात्र तातडीची सभा बरखास्त झाल्यास लगेच अर्ध्या तासाने सभा घेतली जाईल व या ही सभेला उपस्थिती संख्येचा नियम लागू होणार नाही.

६ सर्व सभांचे निर्णय बहुमताने घेतले जातील. समान मतदान पडल्यास निर्णयात्मक मत देण्याचा अधिकार अध्यक्षांना राहील.

७. अध्यक्षांच्या अनुपस्थित सभा आपला अध्यक्ष निवडून घेईल.

आयुक्त ... COMMISSIONER ... GION, AKOLA ... भाग, अकोला

Secretary, Homoeopathic Education Society, AKOLA. (Vidarbha) B. S.

८. या घटनेनुसार होणाऱ्या लागोपाठ चार सभेस, योग्य कारणाशिवाय उपस्थित न राहणाऱ्या सभासदाचे सभासदत्व रद्द होईल.

१६. वर्षारंभ :- या मंडळाचा वर्षारंभ प्रतिवर्षी १ जुलै पासून होत जाईल.

१७. उत्पन्न :- होमिओपॅथिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या उत्पन्नाच्या बाबी खालील प्रमाणे राहतील.

१ महाविद्यालयाची प्रवेश फी, शैक्षणिक फी प्रात्यक्षीक फी व दंड वसूली.

२ देणग्या

३ वसतीगृहाची वसूली

४ संस्थेच्या अंतर व बाह्य रुग्णालयाचे उत्पन्न.

५ महाविद्यालयाच्या, अभियांत्रिकी, बी फार्म, तंत्रनिकेतने तसेच शाळांच्या शैक्षणिक फि द्वारे होणारे उत्पन्न व अन्य सर्व प्रकारची फी.

१८. खर्च :- या मंडळाच्या खर्चाच्या बाबी खालील प्रमाणे राहतील.

१ शाळांच्या, महाविद्यालयाच्या प्राध्यापक वर्गाचे सन्मान वेतन किंवा वेतन.

२ शाळा, महाविद्यालये, दवाखाने, रुग्णालये व वसतीगृह यासाठी होणारा खर्च.

३ या मंडळाच्या कामकाजासाठी करावा लागणारा खर्च.

४ या मंडळाच्या उद्देश पूर्तीसाठी होणारा खर्च.

१९. हिशोब तपासणे :- या मंडळाचे हिशोब तपासण्या करता संस्थापक मंडळ हिशोब तपासणीची नेमणूक करील.

२०. बँक :- ह्या संस्थेचा आर्थिक व्यवहार कोणत्याही नॅशनलाईझड् बँकेद्वारे करण्यात यावा.

२१. कायद्याचे सल्लागार :- वेळोवेळी लागणाऱ्या कायद्याचे सल्लागार ठरविण्याचे अधिकार घटनेच्या नियम ६ मधील पदाधिकाऱ्यांना राहतील.

22 घटनेत बदल :- या घटनेत व नियमात तसेच इतर नियमांत योग्य बदल करण्याचा अधिकार संस्थापक मंडळास राहील. मात्र तशी सूचनात्मक नोटीस सभेच्या दहा दिवस अगोदर द्यावी लागेल तत्संबंधी निर्णय उपस्थित सभासदांच्या तीन चतुर्थांश बहुमताने घेतला जाईल.

Secretary / Treasurer
Homoeopathic Education Society,
AKOLA. (Vidarbha) B. S.

...COMMISSIONER ... AKOLA

23 [illegible]पवाद :- सभासदाने या संस्थेच्या हिताकरता सद्हेतूने केलेले कार्य केवळ घटनेनुसार नाही या कारणास्तव ते कार्य अग्राह्य ठरणार नाही.

दाखला देण्यात येतो की होमिओपॅथिक शिक्षण प्रसारक मंडळ, अकोला ह्या संस्थेचे पान क्र. १ ते ७ प्रमाणे सुधारित नियमावलीची सत्यप्रत असून त्याबाबत खालीलप्रमाणे सह्या केलेल्या आहेत.

१) डॉ. आर. एम. चिंचोळकर - [signature]

2) श्री कृष्णदत्तप्रसादजी तिवारी - [signature]

३) डॉ. डी. डी. डेहनकार. D. D. Dehankar

धर्मादाय उपआयुक्त
DEPUTY CHARITY COMMISSIONER
सत्यमेव जयते
AKOLA REGION, AKOLA
अकोला विभाग, अकोला

Made by-
Read by-
Treat by-

XEROX TRUE COPY
[signature] 2020
Superintendent
Public Trusts Registration Office
Akola Region, Akola

[signature]
Secretary / ~~Treasurer,~~
Homoeopathic Education Society
AKOLA. (Vidarbha) ~~B. S~~